# समर्पण

**चाल :- अशी भेटली गुरूमाई फळा आली हो पुण्याई**

ज्ञान अमृतमय विचार, सद्भावाचा व्यवहार
दिव्य गुणांचे हे, दिव्य आचारण
सदगुरूला SSSS, करू समर्पण ।। धृ ।।

गुरूज्ञान दिव्य गुणांची, जोड असावी
अंतरात गुरू भक्तीची, ओढ असावी (२)
करूनीया संगत, सेवा सीमरणं SSSS
सदगुरूला SSSS, करू समर्पण ।। १ ।।

सजवावे जीवण आपुले, सुंदर कृतीने
जींकावे अवघे जग हे, प्रेमळ वृत्तीने (२)
सदाचारी असो, सदा वर्तनं SSSS
सदगुरूला SSSS, करू समर्पण ।। २ ।।

गुरूबोध घेऊनीया, स्वहिताला जागु
मनातील अहंकार, वैर - द्वेष त्यागु (२)
प्रेम नम्रतेने, जगुया जीवन SSSS
सदगुरूला SSSS, करू समर्पण ।। ३ ।।

ममतेचा - समतेचा, हा स्नेहदिप
"परशुरामा" तेवत राहो, तुझीया समीप (२)
दिव्य प्रकाशात, वेचु ज्ञानकणं SSSS
सदगुरूला SSSS, करू समर्पण ।। ४ ।।